REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १४ जून, १९४४ अंक २४

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

**आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.**

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

**सर होमी मेहता,** के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
**मोति माणिक मॅन्शन,**
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
**मेहता हाऊस,**
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

## विविध माहिती

### सरकारी नोकरांच्या, सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील नोटा

सरकारी नोकरांच्या लांचलुचपतीच्या प्रकारांस आळा घालण्यासाठीं आणखी अधिकार स्वतःकडे घेण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. वाममार्गानें मिळविलेला पैसा सरकारी नोकर हजार रुपयांच्या दर्शनी किंमतीच्या चलनी नोटांच्या स्वरूपांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें ठेवतात, अशी कल्पना आहे. सरकारी नोकरांचे व्हॉल्ट उघडून पहाण्याचा सरकारनें प्रारंभ करावा, असें सुचविण्यांत येत आहे.

### भिकाऱ्यांसाठी स्वावलंबी वसाहती

हिंदुस्थानांतील भिकाऱ्यांच्या पोषणाचा प्रश्न सोडविण्याची योजना श्री. मुणीलाल मेहरा ह्यांनीं आंखली आहे. ह्या योजनेस १ कोट रुपये खर्च येईल.

### "नियोजन" खात्याच्या कामास प्रारंभ

सर आर्देशिर दलाल ह्यांच्या नेतृत्वाखालीं नव्या 'नियोजन खात्या'च्या वरिष्ठ जागांसाठी बाहेरून नोकर आणविण्यांत यावयाचे आहेत, परंतु त्यांच्या हाताखालीं मात्र हिंदीच नोकर देण्यांत येतील.

### पी. डब्ल्यू. डी. खातें

मुंबई प्रांताच्या पब्लिक वर्क्स खात्यावर १९४२–४३ मध्यें १,७३,७७,७११ रुपये खर्च झाला. प्रांतांतील खडीच्या व कच्च्या रस्त्यांची लांबी अनुक्रमें १०,६०२ मैल व १०,०४० मैल आहे, त्यांपैकीं अनुक्रमें ६,२३८ मैल व ३१० मैल रस्त्यांची व्यवस्था पी. डब्ल्यू. डी. कडे आहे. त्यांवर खात्यानें ९७ लक्ष, ७४ हजार रुपये खर्च केला, त्यापैकीं ४३ लक्ष, ७० हजार रुपये नेहमीच्या उत्पन्नांतून मिळाले; ४९ लक्ष, १० हजार रुपये पेट्रोल करांतून आले; ३ लक्ष, ९० हजार रुपये प्रांतिक रोड फंडांतून मिळाले व १ लक्ष, ३ हजार रुपये स्पेशल डेव्हलपमेंट फंडांतून आले. दापोडीच्या वर्कशॉपमध्यें ३ लक्ष, ५० हजारांचें काम पुरें होऊन त्यांत ५९ हजार रुपये नफा राहिला. १९४२–४३ मध्यें विजेच्या पुरवठ्याचा एकहि नवीन परवाना देण्यांत आला नाहीं. सध्यां ६५ शहरांतून विजेचा पुरवठा चालू आहे. विजेवरील करांचें उत्पन्न ३२ लक्ष, ३५ हजार रुपये भरलें. पी. डब्ल्यू. डी. च्या व्यवस्थेखालील रस्त्यांच्या दुतर्फा ७,२३,४०१ झाडें होतीं. म्हणजे, एका वर्षांत त्यांची संख्या ४ हजारांनीं घटली.

### औषधांचा अवास्तव सांठा करूं नका

कित्येक लोक औषधें, लहान मुलांस लागणारीं अन्नें व पेयें इत्यादींचा मामुली गरजेपेक्षा मोठा सांठा करून ठेवतात, त्यामुळें इतरांची गैरसोय होते. असा सांठा करणें गुन्हा असून तो उघडकीस आल्यास त्यावर खटला भरला जाईल व गुन्हा सिद्ध झाल्यास जबर शिक्षेस तो पात्र होईल, असें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

### मुंबई प्रांतांत आणखी १ लक्ष टन धान्य पिकणार

"बॉंबे ग्रोथ ऑफ फूड क्रॉप्स ॲक्ट"ची अंमलबजावणी मुंबई प्रांताच्या कांहीं विभागांत होत असल्याकारणानें कपास व तंबाखू ह्या खालील सुमारें ६ लक्ष एकर जमिनींत धान्यांची पेरणी होईल व प्रांतांतील धान्याच्या उत्पादनांत त्यामुळें १ लक्ष टनाची भर पडेल, असा अंदाज आहे. सरकार ठराविक किंमतीस धान्य विकत घेण्याची हमी देणार आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ५,००,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... १८६ |
| २ लंडनमधील हिंदुस्थानचा शिलकी पैसा | ... १८७ |
| ३ चेकची सुरक्षितता वाढविता येईल काय ! | ... १८८ |
| ४ सर रामन ह्यांचा नवा शोध | १८८ |
| ५ स्फुट विचार | ... १८९ |
| मित्रराष्ट्रांची पश्चिम युरोपांत स्वारी—विश्वविद्यालयांन परीक्षांतला गोंधळ—मि. मॅरिम्यू नॉर्मन | |
| ६ संगमनेर मर्चंट्स असोसिएशन | ... १९० |
| ७ शेअर बाजार | ... १९० |
| ८ हिंदुस्थानच्या सांचलेल्या शिलका | ... १९१ |
| ९ महाराष्ट्राच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न | ... १९१ |

अर्थ

बुधवार, ता. १४ जून, १९४४

## लंडनमधील हिंदुस्थानच्या शिलकी पैशाचें काय करणार ?

### ब्रिटिश वृत्तपत्रांची पोटदुखी

इंग्लंड व अमेरिका ह्यांचे वतीनें हिंदुस्थानमध्यें येथील चलनांत खर्च होतो, त्याचे पैसे ह्या देशास लंडनमध्यें मिळतात आणि त्याच्या शिलका लंडनमध्यें साचून रहातात. हे पैसे हिंदुस्थानास परत कसे मिळावयाचे आणि ते येथें परत कसे आणावयाचे हा मोठा अवघड प्रश्न होऊन बसला आहे. जपानशीं चाललेल्या युद्धामुळें मित्रराष्ट्रांचा हिंदुस्थानांतील खर्च वाढणार असून तो भागला जाण्यासाठी येथील सरकारास चलनी नोटांचा प्रसार करावा लागतो. ह्या नोटांस लंडनमध्यें जमा होणाऱ्या शिलकांचा पौंड-स्टर्लिंगचा आधार असतो. तथापि, हिंदुस्थानांत पसरणाऱ्या चलनाचा परिणाम महागाईस अनुकूल असा होतो. हिंदी राष्ट्राचा पैसा लंडनमध्यें सुरक्षित आहे, परंतु त्याच्या योगानें वाढणारी महागाई लोकांस जाचक होते. " लंकेंत सोन्याच्या विटा " अशाचपैकी हा प्रकार झालेला आहे आणि त्यामधून कसा मार्ग काढावा ह्याचें कोडें पडलें आहे. हिंदी पुढाऱ्यांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदी शिलकांचा उपयोग उद्योगधंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्याकडे केला जावा आणि ही आयात कशी व्हावी ह्या विषयींचा कार्यक्रमहि निश्चितपणानें आखला जावा. अमेरिकेंत भरणाऱ्या जागतिक चलन परिषदेंत आंतरराष्ट्रीय देवघेवीच्या वजावाटीचा प्रश्न चर्चिला जाणार असल्यानें हिंदुस्थानच्या शिलकांचा विषय तीमध्यें उपस्थित केला जाईल. परिषदेचा निर्णय स्वतःच्या इच्छेप्रमाणें होणार नाहीं अशी भीति ब्रिटिश धंदेवाले आणि त्यांचीं मुखपत्रें ह्यांस वाटत आहे. ह्या भीतीचें कारण दुहेरी आहे. एकतर अमेरिकन व ब्रिटिश कारखानदार व व्यापारी ह्यांचेमध्यें हिंदुस्थानाशीं व्हावयाच्या व्यापाराचे संबंधांत स्पर्धा असून त्यांची परस्परांच्या धोरणाबाबत एकमेकांविरुद्ध टीकाहि झाली आहे. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्या चलनाचा पौंड-स्टर्लिंग हा एकच आधार असल्यानें आपणांमधील हुंडणावळीचा प्रश्न त्यांनीं परस्पर सोडवावा आणि त्यांच्या भानगडींत अमेरिकेनें पडण्याचें प्रयोजन नाहीं अशी ब्रिटिश धंदेवाल्यांची विचारसरणी आहे.

दुसरी आणि जबरदस्त अडचण इंग्लंडला वाटत आहे ती अशी आहे. हिंदुस्थानच्या मालकीचे हजार–पंधराशें कोटि रुपये ह्या देशास पाठवण्याचा बोजा इंग्लंडवर येऊन पडणार आहे. ही प्रचंड रक्कम लंडनमध्यें पौंडांत आहे आणि ह्या पौंड-स्टर्लिंगचें रूपांतर हिंदी चलनांत म्हणजे रुपयांत व्हावें लागेल. हिंदुस्थानावरील हुंड्यांच्या खरेदीच्या मार्गानें ही तबादिली करावी लागेल आणि अशा हुंड्या ब्रिटिश मालाच्या निर्गतीवरच निघणार. ह्या हुंड्यांचा पुरवठा मर्यादित असणें अपरिहार्य आहे आणि त्यांस मागणी मात्र मोठी रहाणार. त्याचाच अर्थ पौंड-स्टर्लिंगचें आंतरराष्ट्रीय मोल टिकवण्यांत अडचण उत्पन्न होणार असा आहे. मागें हिंदुस्थान सरकारास " होमचार्जेस " साठीं प्रतिवर्षी मोठ्या रकमा पाठवावयाच्या असत तेव्हां रुपयाचें पौंडांतील मोल म्हणजे हुंडणावळीचा कायदेशीर दर स्थिर राखण्याची पंचाईत होई आणि त्याप्रीत्यर्थ हिंदी चलनपद्धतींत बदल करण्याची आवश्यकता भासे व विविध उपायांची योजना करावी लागे ह्या गोष्टींचें स्मरण केलें असतां आज इंग्लंडला पडलेल्या पेचाची कल्पना येईल. त्यावेळीं इंग्लंड धनको राष्ट्र आणि हिंदुस्थान ऋणको राष्ट्र अशी परिस्थिति होती. आज हें चक्र फिरलें आहे. हिंदुस्थाननें इंग्लंडमधलें आपलें सर्व कर्ज फेडून टाकलें आहे, एवढेंच नव्हे तर हा देश सध्यां धनको बनला असून शेकडो कोटि रुपये त्यास इंग्लंडकडून यावयाचे आहेत. जागतिक चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी लंडनमधील स्वतःच्या देशाच्या शिलकेचा विनियोग अमेरिका वगैरे देशांत यंत्रसामुग्रीसारखा माल सोयीप्रमाणें खरीदण्याकडे होण्यास मुभा असावी असें प्रतिपादणार आहेत. ह्या बातमीनें ब्रिटिश व्यापारी वृत्तपत्रें बेचैन झालीं आहेत. हिंदुस्थानच्या व्यापारांत इंग्लंडची मक्तेदारी अबाधित रहावी, ह्या देशाच्या चलनाचा आधार सध्याप्रमाणें पौंड-स्टर्लिंग युद्धोत्तर काळांतहि असावा, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांच्या व्यापारांत अमेरिकेनें स्वतःचें घोडें दामटूं नये, हिंदुस्थाननें लंडनमधील आपल्या शिलकांतून ब्रिटिश मालच खरेदी करावा व त्यांची अमेरिकेने डॉलर्समध्यें तबादिली करण्याच्या फंदांत पडूं नये अशा आशयाचे उद्गार ब्रिटिश वृत्तपत्रें काढीत आहेत, ह्यावरून त्यांचें मनःस्वास्थ्य कसें बिघडलें आहे ह्याची कल्पना येते. जागतिक चलन परिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं इतर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांच्या सुरांतच स्वतःचा सूर मिळवावा आणि स्वतंत्र विचार प्रकट करूं नयेत, नाहींतर अमेरिकन धंदेवाले असल्या मतभेदाचा फायदा घेऊन स्वतःच्या चलनाच्या व व्यापाराच्या संरक्षणासाठी व चलतीसाठी त्याचा फायदा घेतील व ब्रिटिश व्यापार मागें पडेल ह्या भीतीनें त्यांस पछाडलें आहे. सर षण्मुखम् चेट्टी व श्री. ए. डी. श्रॉफ ह्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं ह्या कोल्हेकुईस स्पष्ट उत्तर दिलें आहे आणि हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें आपणांस योग्य दिसेल त्या धोरणाचा पुरस्कार परिषदेंत आपण करणार आणि तसें करण्याचें स्वातंत्र्य हिंदुस्थान सरकारनें आपणांस दिलें आहे असें जाहीर केलें आहे.

## चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय ?

आपलें ता. ७ जून १९४४ चे अंकांत श्री. पी. सी. बेंद्रे यांनीं "चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय?" या मथळ्याखालीं उपस्थित केलेला मुद्दा व्यावहारिक दृष्ट्या अपायकारक होण्याचा संभव अधिक दिसतो, व त्यामुळें चेकची सुरक्षितता वाढली तरी त्याबरोबर त्याचा दुरुपयोग करण्याची कला सुद्धां वाढीस लागण्याचा संभव अधिक! कुठलाही एखादा खातेदार एखाद्या पार्टीस (खोटा) चेक देईल व बँकेस तो न वटविण्याविषयीं हुकूम करील. बँकेला खातेदाराविषयीं कोणत्याच प्रकारची शंका घेतां यावयाची नाहीं व चेक परत करावा लागेल व अशा तऱ्हेनें एखाद्या खातेदाराचा व्यवहार शंकास्पद असूनही बँकेस कांहींही करतां न येऊन उलट अशा व्यवहार करणाऱ्या माणसास बँकेकडून उत्तेजन दिल्यासारखें होईल. सहाजिकच याचा परिणाम बँकेच्या पतीवरही होईल; करितां याबाबत असलेला सध्यांचा नियमच जास्त योग्य आहे.

चेकची उपयुक्तता व सुरक्षितता ज्यांना पटली आहे त्यांचेसंबंधीं प्रश्नच नाहीं. पण ज्यांना ती कळलेली नाहीं त्यांच्याकरितां तरी हा नियम बदलणें कांहीं मार्ग नव्हे. कळावें.

आपला
बा. वि. झुंबरे
(मराठा मार्केटस पीपल्स को. बँक, लि. मुंबई)

## सर सी. व्ही. रामन् यांचा नवा शोध

हिरा हा पदार्थ ज्याप्रमाणें आर्थिकदृष्ट्या त्याचप्रमाणें शास्त्रीय दृष्ट्याही अत्यंत मोलाचा आहे. रासायनिकदृष्ट्या हिरा म्हणजे स्फटिक (crystalline) रूपांत असलेला शुद्ध कार्बन. हिरा जाळल्यास कॅर्बानिक ॲसिड वायू होतो. हिऱ्यामधील कर्बाचे परमाणूंचा एकमेकांशीं रासायनिक संयोग झालेला असतो. आजपर्यंत हिरा म्हणजे एकच अगडबंब अणू असावा अशी कल्पना होती. परंतु सर रामन् यांच्या प्रयोगांमुळें असें उघडकीस आलें आहे, कीं ही समजूत चुकीची आहे.

सर रामन् यांचा नवा सिद्धांत असें दर्शवितो कीं, हिऱ्याचे चार प्रकार असूं शकतात व हिऱ्याच्या प्रत्येक स्फटिकांत दोन अगर अधिक प्रकारच्या हिऱ्यांचें कमीअधिक एकजीव असें मिश्रण असतें. हा सिद्धांत कर्ब परमाणूच्या भौमितिक दृष्ट्या केलेल्या अभ्यासावर आधारलेला आहे.

असे चार प्रकारचे हिऱ्याचे कण खरोखरीच असतात ह्या विधानास प्रत्यक्ष प्रयोगावरून पुष्टि मिळते, कारण या चार प्रकारच्या हिऱ्यांतील फरक निरनिराळ्या प्रकाशांत दिसून येतो. अल्ट्रा व्हायोलेट उजेडांत ठेवलेल्या हिऱ्यांतून बाहेर पडणाऱ्या प्रकाशाचा रंग चारहि प्रकारांत वेगळा असतो व क्ष किरणांच्या परावर्तनांत सुद्धां फरक कळून येतो.

सर रामन यांच्या सिद्धांताची व प्रयोगांची माहिती व प्रयोगार्थ घेतलेलीं हिऱ्यांचीं छायाचित्रें नुकतीच इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्सनें प्रसिद्ध केलेल्या एका ग्रंथांत दिलीं आहेत.


## Deccan Institute Of Commerce, Poona

(Recognised by Government).

Classes for the 1944–45 Session begin on Saturday the 1st July. Students admitted for G. D. C. & C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st Part), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application.

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School, Poona. } Secretary.

D. E. SOCIETY'S

## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College reopens on the 20th June 1944. Admissions to the F. Y. Com., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

D. G. Karve,
*Principal.*

वाढत्या पुण्याचें वाढतें वैभव !
७० प्लॉट्सची
रामबाग कॉलनी समोर × × × हवेशीर
आयडियल कॉलनी
मोठ्या सरकारी रस्त्यावर × × × सोयिस्कर
प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ८०० ते रु. १५००
प्रत्येक प्लॉटचें क्षेत्रफळ अकरा हजार स्के. फूट

म. य. दातार

खालील पत्त्यांवर चौकशी करावी म्हणजे प्लॉटस् दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

१ दया-निवास कॉमनवेल्थ कॉलनी, नारायण पेठ, पुणें २
भेटण्याची वेळ : सकाळीं ७ ते ८॥ व रात्रौ ८ ते ९

२ व्यवस्थापक, मॉडर्न कन्स्ट्रक्शन ॲंड डेव्हलपमेंट कंपनी, जीवनछाया,
भेटण्याची वेळ—सकाळीं ९ ते ११

# स्फुट विचार

## मित्रराष्ट्रांची पश्चिम युरोपांत स्वारी

उत्तर आफ्रिकेंतून जर्मन व इटालियन सैन्यांची हकालपट्टी झाल्यावर मित्रराष्ट्रांनीं प्रत्यक्ष इटलीवर स्वारी केली. तथापि, जर्मनीचा कोंडमारा होण्यास पश्चिम युरोपांत मोठ्या प्रमाणावर नवी आघाडी चालू करण्याची कल्पना बराच काळ शिजत राहिली. इटलींत जर्मन फौजा त्या देशाच्या रक्षणाकरितां अडकून पडल्यामुळें रशियावरील युद्धाचा भार थोडा हलका झाला. तरी पश्चिमेकडून शत्रूस जोराचा शह देण्याचें महत्त्व मित्रराष्ट्रांस पटलेंच होतें. पूर्व आणि पश्चिम ह्या बाजूंच्या युरोपांतील दोन आघाड्यांवर जर्मनीस कात्रींत धरण्यानें शत्रूची अवस्था कठीण झाली असती. तथापि, पश्चिम आघाडीची तयारी प्रचंड प्रमाणांत करणें अगत्याचें होतें. ह्या तयारीस पुष्कळ काळ लागला आणि ही आघाडी केव्हां चालू होते ह्याकडे सर्व जगाचें लक्ष लागून राहिलें होतें. अखेर एक आठवड्यामागें मित्रराष्ट्रांचीं सैन्यें फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावर नॉर्मंडी भागांत उतरलीं आणि जर्मनीच्या प्रतिकारास न जुमानतां त्यांनीं प्रगति हळु हळु चालू ठेवली. मोठीं जहाजें व विमानें ह्यांनीं समुद्र किनाऱ्यावरील जर्मन तटबंदी व तोफा ह्यांचेवर मारा केला आणि ब्रिटिश व अमेरिकन सैनिक व रणगाडे आंत घुसले. सैनिक व दारुगोळा नेण्यासाठीं हजारों जहाजांचा व नावांचा उपयोग करण्यांत आला आणि छत्रधारी सैनिकहि आघाडीवर उतरविण्यांत आले. पश्चिम आघाडीस प्रारंभ कोठें व केव्हां होणार ह्याची शत्रूस कल्पना नसल्यानें त्याचा प्रतिकार प्रथम क्षुल्लक स्वरूपाचा होता. पुढें त्यानें आपलें सैन्य रणांगणावर आणलें तरी त्यास मित्रराष्ट्रांच्या सैन्याची प्रगति बंद पाडतां आली नाहीं. युद्धसामुग्रीच्या बाबतींत जर्मनांस मित्रराष्ट्रांची बरोबरी करतां येणें शक्य नाहीं आणि शत्रूस हळु हळु पण सारखी माघार घ्यावी लागणार हें निश्चित आहे. फ्रान्स व इटली ह्या देशांत आणि रशियन आघाडीवर जर्मनीचें बळ तीन दूर दूरच्या रणांगणांवर वाटले गेल्यानें हिटलरची तारांबळ उडालीच पाहिजे. ह्याशिवाय, त्यानें व्यापलेल्या देशांतील जनतेचा पाठिंबा मित्र राष्ट्रांस मिळून नाझी जुलमाविरुद्ध संधी मिळतांच ती उठल्यावांचून रहावयाची नाहीं. ह्याप्रमाणें जर्मनी तीन बाजूंनीं घेरला गेला आहे आणि त्यानें कांहीं वेळ धडपड केली तरी त्याच्या पाडावाच्या युद्धास आतां प्रारंभ झालेला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु जर्मन सैन्याचा सहजासहजीं पराभव होऊन युरोपांतील युद्ध थोडक्या अवधींत संपुष्टांत येईल अशी भ्रामक कल्पना मित्रराष्ट्रांच्या सेनानायकांत किंवा पुढाऱ्यांत नाहीं. आपलें सर्वांगीण लढाऊ बळ कितीहि असलें तरी त्याच्या जिवावरच आतां बेतलें असल्याकारणानें हिटलर प्रतिकाराची पराकाष्ठा करील आणि स्वतःस मोठ्या अवघड प्रसंगांतून जावें लागेल ह्याची त्यांस जाणीव आहे. ह्या सावधगिरीच्या भावनेनें पण अंतिम विजयाच्या पूर्ण विश्वासानें मित्र राष्ट्रें लढत असून त्यांस चोहोंकडून यश चिंतिलें जात आहे.

---

## विश्वविद्यालयीन परीक्षांतला घोंटाळा

मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटच्या नुकत्याच भरलेल्या सभेंत परीक्षांचे निकाल प्रकट रीतीनें लागण्यापूर्वीच बाहेर फुटतात आणि ह्या बाबतींत अनेक गैरवाजवी प्रकार होतात ह्या गोष्टीस परिस्फुटता मिळाली. विद्येच्या माहेरघरांत असले अनिष्ट प्रकार घडावे ह्याविषयीं कोणासहि उद्वेग वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तरुण पिढीचें व सबंध राष्ट्राचें शील बनवण्याची ज्यांचेवर जबाबदारी आहे अशा विद्वान लोकांचा प्रत्यक्ष संबंध वरील तऱ्हेच्या वर्तणुकीशीं असावा हें विद्यादानाच्या पावित्र्याविषयीं आणि अपेक्षित इष्ट परिणामांविषयीं निराशा उत्पन्न करणारें आहे. विश्वविद्यालयाच्या उपकुल गुरूंनीं, उघडकीस आलेल्या प्रकारांमुळें आपणांस खालीं मान घालावी लागत असल्याचे उद्गार काढले आणि सेनेटच्या इतर सभासदांनीं स्वतःच्या अनुभवाच्या गोष्टी निवेदन केल्या. बाहेर आलेल्या लज्जास्पद घटनांवर निरनिराळे उपाय सुचवण्यांत आले आहेत आणि कांहींतरी परिणामकारक तोडगा अंमलांत आलाच पाहिजे ह्या संबंधानें एकमत दिसून आलें आहे. परीक्षांचे प्रश्न किंवा निकाल फोडणारांचीं दुष्कृत्यें उघडकीस आल्यास त्यांचें पारिपत्य सिंडिकेटकडून आजहि होत असल्याचें सांगण्यांत आलें आहे. पण तेवढ्यानें काम होईल असें आतां वाटत नाहीं हें स्पष्ट झालें आहे. परीक्षकांच्या नेमणुकीच्या पद्धतींत बदल करण्याचा परिणाम विशेष होईल असें कांहींस वाटत आहे. हा सुशिक्षित वर्गाच्या दानतीचाच प्रश्न झाला आहे आणि विश्वविद्यालयासारख्या पवित्र व पूज्य संस्थेनें तो कसेंहि करून सोडवलाच पाहिजे. त्याची चर्चा सेनेटच्या सभेंत प्रांजलपणानें व प्रकट रीतीनें झाली हें चांगलें लक्षण आहे असेंच समजलें पाहिजे.

---

## मि. मॉंटेग्यू नॉर्मन ह्यांची सेवानिवृत्ति

बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदावर मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे गेलीं २४ वर्षें होते. त्या जागेसाठी पुनः ते उभे न राहिल्यामुळें त्यांच्या गव्हर्नरशिपचीं २५ वर्षें पुरीं होत नाहींत व बँकेच्या लवकरच येणाऱ्या २५० व्या वाढदिवशीं व बँक चार्टर कायद्याच्या १०० व्या वाढदिवशीं ते बँकेचे गव्हर्नर राहणार नाहींत. ते गव्हर्नर म्हणून पुनः निवडून आले असते, ह्यांत संशयच नाहीं. असें असूनहि, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनीं आपली जागा सोडण्यांत दाखविलेली मनोभूमिका फारच थोड्या लोकांची असूं शकते. बँकेच्या इतिहासांतील संस्मरणीय प्रसंगीं ते अधिकारपदावर नाहींत, ह्यामुळें त्यांची स्वतःची मुळींच निराशा होत नसली तर त्यांच्या सहकाऱ्यांस मात्र बरें वाटणार नाहीं. केवळ एकच वर्ष आपण अध्यक्ष असतांना संस्थेचा रौप्य अथवा सुवर्ण महोत्सव त्याच्या तारखेची ओढाताण करून घडवून आणणारे पुष्कळ दृष्टीस पडतांत. त्याचप्रमाणें आपल्या कारकीर्दींत इमारतीचें उद्घाटन व्हावें, पुलाचें नामकरण व्हावें, पायाचा दगड बसविण्यांत यावा, मानपत्र समारंभ व्हावा, असें संस्थांच्या चालकांस वाटतें. बँक ऑफ इंग्लंडसारख्या संस्थेचे २४ वर्षें गव्हर्नर असलेले मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे आपल्या स्वतःच्या कारकीर्दीच्या ज्युबिलीसाठी, संस्थेच्या २५० व्या वाढदिवसासाठी व बँक चार्टर ॲक्टाच्या १०० व्या वाढदिवसासाठी, हे सर्व समारंभ एकदमच येत असतांहि, आपल्या स्थानास चिकटून बसण्यास तयार नाहींत, ही गोष्ट उद्बोधक आहे.

## संगमनेर मर्चंटस असोसिएशन

( लि. आ. म. )

ही संस्था ता. ११-५-४४ रोजीं स्थापन झाली. सुरुवातीस या संस्थेचे १४ सभासद होते. ती संख्या आज १५२ वर गेली आहे. या संस्थेनें चालू वर्षात २०६१ रुपये वर्गणी रुपानें गोळा केले. या संस्थेचे कामाकरतां १ कारकून व १ नोकर असे ठेवले असून त्यांचे पगाराकरता ३७५ रुपये खर्च झाला. तसेंच कायमच्या उपयोगी पडणाऱ्या जिनसा, उदाहरणार्थ, जाजमे, गाद्या, तक्के वगैरे सामान १७५ रुपयाचे खरेदी केले.

कापडाचे व्यापाऱ्यांना व सुताचे व्यापाऱ्यांना लायसेन्स मिळवून देण्याचें काम असोसिएशनचे जबाबदार अधिकाऱ्यांनीं वेळेवर केल्यामुळें बहुतेक सर्व व्यापाऱ्यांना लायसेन्सें मिळालीं. अशा व्यापाऱ्यांकडून त्रैमासिक कापडाच्या साठ्याची व मासिक सुताच्या साठ्यांचीं पत्रकें योग्य अधिकाऱ्यांकडे पाठविलीं जात आहेत.

व्यापार वाढीचे दृष्टीनें असोसिएशननें स्टँडर्ड क्लॉथ विक्रीचे काम हातीं घेऊन त्याकरतां भांडवल उभारून कापडाच्या व्यापाऱ्यांचें एक सिंडिकेट निर्माण केलें आहे. अशा सिंडिकेटमध्यें ५५ सभासद असून त्यांनीं ६,१०० रुपये जमविले आहेत. ही स्टँडर्ड क्लॉथची विक्री फायदेशीर व समाधानकारक चाललेली आहे.

या असोसिएशनतर्फे नेमलेल्या धान्य कमिटीनें एकंदर १०८ पोतीं धान्य ( बाजरी ) सुमारें ३०० गरीब कुटुंबांस ४ महिने वांटलें. हेंच काम जरूर वाटल्यास पुन्हा सुरू करण्याचा असोसिएशनचा विचार आहे.

या असोसिएशनचे कामास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई व मे. टेक्स्टाइल कमिशनरसाहेब, मुंबई यांचेकडून वेळोवेळीं माहिती व हुकूम मिळाल्यामुळें फार मदत झाली आणि त्याबद्दल असोसिएशन त्यांची फार ऋणी आहे.

या असोसिएशनमध्यें सुमारें ७० धान्याचे व्यापारी आहेत. त्यांनीं एक मोंढा ( डबरा ) स्थापन केला आहे. त्यांत धान्य (हट्टी शेंगा) खरेदी-विक्रीचें कामें त्यांनीं उत्साहानें चालविलें आहे. हें काम असोसिएशननें मोंढ्याचे नियम केले आहेत, त्याप्रमाणें चाललें आहे. ही संस्था व्यापाऱ्यांच्या एकीची व प्रेमाची साक्ष देत आहे.

कापड व सूत व्यापारी तसेंच धान्याचे व्यापारी यांनीं कांहीं अडचणी असोसिएशनचे नजरेस आणल्यास त्याचा खुलासा संबंध असलेल्या अधिकाऱ्यांकडून आणून त्यांना पुरविण्यांत येतो.

वार्षिक सभेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. त्यांत झालेले ठराव सर्वानुमतें पास झाले. असोसिएशनचे सभासदांनीं सर्वानुमतें प्रेसिडेंट म्हणून संगमनेर येथील सुप्रसिद्ध, उत्साही व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मुंबईचे मेंबर श्री. पन्नालाल शिवनाथ लाहोटी यांना निवडलें आहे. तसेंच व्हाइस प्रेसिडेंटचे जागेकरतां येथील कळकळीनें व निरपेक्ष बुद्धीनें काम करणारे कापडाचे व सुताचे व्यापारी श्री. रामनाथ गोविंदराम सोभाणी यांना निवडलें आहे.

असोसिएशनचें काम समाधानकारक चालावें म्हणून ही असोसिएशन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांची सभासद झाली आहे व इंडियन मर्चंट्स चेंबर मुंबई यांचे सभासद होण्याचें तिनें ठरविलें आहे.

येथे एकच गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही कीं, या असोसिएशनचे मेंबर होण्याकरतां आसपास स्थापन झालेल्या दुसऱ्या असोसिएशननें विनंती केली आहे व ती विनंति या असोसिएशननें मान्य केली असेबद्दल ठराव केला आहे.

असोसिएशनच्या अधिकारीवर्गाची इच्छा अशी आहे कीं, नगर जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स स्थापन करून व्यापाऱ्यांचे अडीअडचणी निवारण्याचें काम सोईवार करावें व त्याप्रमाणें प्रयत्न सुरू आहेत. पण जिल्ह्याचे ठिकाणीं राहाणारे व्यापाऱ्यांनीं मनावर घेतल्यास कार्य लवकर सुरू होईल.

---

## शेअर बाजार

( लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. २४ डे. जि. पुणें ४ )

युरोपवर पश्चिमेकडून हल्ला चढविला गेला तर त्याचा बाजारावर विशेष परिणाम होईल ही अपेक्षा फोल ठरलेली आहे. टाटा डिफर्ड व ऑर्डिनरी हे २२२५ व ४१५ पर्यंत फक्त टिकून राहिलेत. गिरण्यांचे भाव सारखे पडून राहिलेत तिथेंच आहेत.

दुसऱ्या आघाडीचा हिंदुस्थानवर काय परिणाम व्हावा ? हिंदुस्थानचा फ्रान्सशीं बन्यापैकीं व्यापार चालू होता तो आज चार वर्षे बंद आहे. तो कांहीं एकदम सुरू होत नाहीं. किंवा फ्रान्सच्या रणभूमीवर लढणाऱ्या सैन्यालाही रसद पुरविण्याचें काम येथून व्हावयाचें नाहीं. तेव्हां युद्धांतील प्रमुख घटना म्हणून जरी दुसऱ्या आघाडीला महत्त्व असलें तरी त्याचा बाजारावर तादृश परिणाम होण्याचें कारण नाहीं. मात्र जर दोस्तांनीं एकादी अचानक माघार खाल्ली तर त्याचा विपरीत परिणाम नक्की दिसेल.

सध्या बाजारांत डिफर्ड २५०० होईल अशी भाषा सुरू आहे. ही भाषा आपल्याला नवीन नाहीं. व्याजाच्या कांहींही बातम्या असल्या तरी टाटा मंडळी 'बासनां' तून कांहीं काढतील असें वाटण्याचें कारण नाहीं. डिफर्डचे ऑर्डिनरी होणार असले व नवीन भांडवल निघणार असलें तरी सर्व गोष्टींचा विचार करतां २२००—२२५० भावाच्या वर डिफर्ड घेण्याच्या मोहांत सापडण्याचें टाळलें पाहिजे. तो आणखी वर जाणार असला तरी खुशाल जाऊं द्यावा. आपली व त्या शेअरची ओळख फार जुनी आहे. घ्यावयाचाच झाला तर ऑर्डिनरी बरा वाटतो.

---

### वाया जाणाऱ्या तिकिटांचा उपयोग

प्रत्येक आठवड्यास १० टन वजनाचीं ६०० पोतीं भरलेलीं बसचीं व ट्रॅमचीं तिकिटें लंडनमध्यें जमा करून त्याचा रांधा बनविण्यासाठीं धाडण्यांत येतात. त्याचप्रमाणें ९० लक्ष रेल्वे तिकिटेंहि गोळा केलीं जातात.

### पुण्याभोंवतालचा मलेरिया हटविण्यासाठीं ५० हजार रुपयांची योजना

पुण्याच्या भोंवतालच्या विभागाची पब्लिक हेल्थ खात्यानें नुकतीच पहाणी केली, तिच्यांत आढळून आलें कीं, येरवडा भागांत हिंवतापाचा उपद्रव सर्वांत अधिक आहे. शंकरशेट रस्ता, पर्वतीची टेकडी व मुठा नदीच्या काळव्याजवळील भाग ह्यांतहि हिंवतापाचा प्रसार जास्त आहे. हा हिंवताप हटविण्यासाठीं वार्षिक ५० हजार रुपये खर्चाची एक योजना डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांनीं आंखली आहे.

## हिंदुस्थानच्या ग्रेट ब्रिटनमधील सांचलेल्या शिलका

### प्रमुख पुढाऱ्यांचें मत

हिंदुस्थानच्या ग्रेट ब्रिटनमधील सांठलेल्या येण्याबद्दल चालू असलेल्या, ग्रेट ब्रिटनमधील चर्चेस उद्देशून **सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास** म्हणाले, " आर्थिक कत्तलीपासून बचाव व्हावा, ह्यासाठी हिंदुस्थानास आर्थिक आत्महत्त्या करण्याचा आग्रह करण्यांत येत आहे. हिंद–ब्रिटन आर्थिक कराराची दुरुस्ती करण्यास हिंदुस्थानास प्रवृत्त करण्याचा हा प्रयत्न आहे. ग्रेट ब्रिटनशीं येण्या-देण्याबद्दलचीं बोलणीं करावयाचीं तीं लोकमतानुवर्ती हिंदी सरकारच्या प्रतिनिधींनींच समान पातळीवर केलीं नाहींत, तर बोलण्यांचा निष्कर्ष हा हिंदुस्थानावर राजकीय वर्चस्वाच्या आधारानें लादलेला निकाल आहे, असेंच हिंदी जनता समजेल." " युद्धखर्चाची हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यामध्यें वांटणी केली जाते, त्या करारांत बदल करण्यास हिंदुस्थान सरकारनें तयार होऊं नये. हिंदुस्थानाचें इंग्लंडमध्यें येणें साठलें आहे, त्याचा विनियोग व परतफेड ह्याविषयीं ब्रिटिश सरकारशीं बोलणीं सुरू करावी व त्यासंबंधांत प्रातिनिधिक बिनसरकारी हिंदी लोकमताचा सल्ला घेण्यांत यावा " असें **श्री जी. एल. मेहता** हे म्हणाले. **सर षण्णमुखम् चेट्टी** म्हणाले, "ब्रिटिश वृत्तपत्रांचा सूर हा कांहीं नीट नाहीं. हिंदुस्थानाचें देणें आम्हीं लागत नाहीं, अशी धमकी त्यांत असल्याचें दिसतें व हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांमधील युद्धखर्चाची वाटणी हिंदुस्थानासच विशेष फायद्याची आहे अशी त्यांत सूचना आहे." **श्री. जी. डी. बिर्ला** म्हणाले, "हिंद-ब्रिटन आर्थिक कराराची फेरतपासणी व्हावी, असें लॉर्ड केन्स सुचवितात. ग्रेटब्रिटन हिंदुस्थानाचें देणें देणार नाहीं, असें म्हणण्यासारखेंच हें आहे. युद्धापूर्वी हिंदुस्थान देश इंग्लंडचा देणेकरी लागत होता, तें मुख्यतः ब्रह्मी, अफगाण व ॲबिसिनियन युद्धाचा बोजा हिंदुस्थानावर लादलेला होता म्हणूनच. त्यापासून हिंदुस्तानास कांहींच फायदा झाला नाहीं, परंतु आतां इंग्लंडनें कर्ज फेडण्याची वेळ आली असतांना, लॉर्ड केन्ससारखा जबाबदार मनुष्य कर्ज बुडविण्याच्या कल्पनेस चालना देत आहे."

---

## महाराष्ट्राच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न*

महाराष्ट्र संवर्धन ग्रन्थमालेंतील पहिलें पुस्तक म्हणून, श्री. एन. जी. आपटे ( पाणी-पुरवठा सल्लागार ) ह्यांचें वरील इंग्रजी पुस्तक श्री. य. रा. दाते ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. श्री. आपटे ह्यांचे वरील विषयावरील लेख व भाषणें हीं प्रस्तुत पुस्तकांत एकत्रित केलेलीं आहेत. अशाच प्रकारचीं आणखी पुस्तकें प्रसिद्ध करून, महाराष्ट्राच्या शेतीविषयक व इतर संपत्तीच्या प्रश्नांवर प्रकाश पाडण्याचा ग्रन्थमालेचा उद्देश आहे. (१) हिंदुस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या जिल्ह्यांच्या सलग विभागांतील अन्नपुरवठ्याची परिस्थिति हा निबंध, ( २ ) महाराष्ट्र अन्नोत्पादन व पुरवठा परिषदेंतील श्री. आपटे ह्यांचें प्रास्ताविक भाषण, ( ३ ) त्यांत निर्माण झालेल्या मुद्यांवर श्री. आपटे व डॉ. ॲकरॉइड ह्यांचेमधील पत्रव्यवहार, ( ४ ) हिंदी पिकांच्या उत्पादनाच्या नियोजनासंबंधींचा फेडरेशनच्या वार्षिक सभेंतील ठराव मांडतांना श्री. आपटे ह्यांनीं केलेलें भाषण व ( ५ आणि ६ ) केसरी-हिंदमधील दोन लेख हीं प्रस्तुत पुस्तकांत उद्धृत केलेलीं आहेत.

* Food Problem of Maharashtra पृ. सं. ७१, किंमन १ रु. महाराष्ट्र सं. ग्रंथमाला, १५२ सदाशिव, पुणें २.


## The Willingdon College, Sangli

Reopens for the academic year on 20th June 1944. The registration of names will commence on 12th June. The college provides for instruction in the Arts and Science courses in the first two years, for B. A. Degree courses pass and Honours, and for Post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60/- per term, and the room rent per term is Rs. 12/- for a double room and Rs. 15/- for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for Lady Students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

**Principal,**
*Willingdon College.*

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले )
टोमॅटो केचप ( गोड ) व
टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस : ९९३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत १९० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, टाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्कॉश, टोमॅटो सॉस, मॅंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅब्लेट्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री बाळगा. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस तो दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. ११, ४४, ४७१० | १९४२ | ५ लक्ष ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | १ लक्ष ९० हजारानें |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक | मॅनेजिंग डायरेक्टर

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ टॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.